PDF Compressor Free Version


# महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ,

10/2, स्टार्की टाऊन-नागपूर ,सदर ,बाजार मंगलवारी ,440001
दुरध्वनी क्रमांक 0712-2978844
E-mail ID : mahaecotourism@mahaforest.gov.in


**विषय:** महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक 11/12/2020 रोजी आयोजित 11 व्या सभेच्या कार्यवृत्तांता बाबत.

**क्रमांक:** व्यसं/मनिपविमं-सभा/प्र.क्र.121/20-21/ 320

**नागपूर:** 440 001, **दिनांक :** 23 /12/2020

प्रति,

1. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) तथा अध्यक्ष कार्यकारी समिती, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
2. व्यवस्थापकीय संचालक, एफडीसीएम लि. नागपूर तथा सदस्य कार्यकारी समिती किंवा त्यांचे प्रतिनिधी.
3. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर तथा सदस्य, कार्यकारी समिती.
4. प्रधान मुख्यवनसंरक्षक (वन्यजीव),महाराष्ट्र राज्य,नागपूर तथा सदस्य, कार्यकारी समिती.
5. अपर प्रधान मुख्यवनसंरक्षक (वन्यजीव), पश्चिम मुंबई तथा सदस्य, कार्यकारी समिती.
6. अपर प्रधान मुख्यवनसंरक्षक (वन्यजीव), पुर्व नागपूर तथा सदस्य, कार्यकारी समिती.
7. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (महा कॅम्पा),महाराष्ट्र राज्य,नागपूर तथा सदस्य,कार्यकारी समिती,
8. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (केंद्रस्थ अधिकारी) म.रा. नागपूर तथा विशेष आमंत्रीत
9. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ ,मुंबई किंवा त्यांचे प्रतिनिधी .
10. उप-महाप्रबंधक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळा, नागपूर

महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या कार्यकारी समितीची सभा, मा प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर तथा अध्यक्ष कार्यकारी समिती, महराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक 11/12/2020 रोजी 5.00 वाजता "कंट्रोल कमांड रुम", वनभवन, नागपूर येथे संपन्न झाली. सदर सभेचा कार्यवृत्तांत सोबत माहितीसाठी सादर करण्यात येत आहे.

**सहपत्र:- वरील प्रमाणे.**

**कार्यवृत्तांत प्र.मु.व.सं.(वबप्र) म.रा. तथा अध्यक्ष, का.स. मनिपविमं यांचेद्वारा मंजूर**

सदस्य-सचिव, कार्यकारी समिती तथा
व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ,
नागपूर (करीता)

PDF Compressor Free Version

**प्रतिलिपी**:-प्रधान सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई -400 032 यांना वरीलप्रमाणे सहपत्रांसह माहितीस्तव सादर.

**प्रतिलिपी**:-अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव सस्नेह अग्रेषित.

**प्रतिलिपी**:-मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) सर्व यांना वरील प्रमाणे सहपत्रांसह योग्य त्या कार्यवाहीस सस्नेह अग्रेषित.

**प्रतिलिपी**:-मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर यांना वरील प्रमाणे सहपत्रांसह योग्य त्या कार्यवाहीस सस्नेह अग्रेषित.

**प्रतिलिपी**:-वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक ताडोबा-अंधारी/ नवेगांव नागझिरा/ सहयाद्री व्याघ्र प्रकल्प कोल्हापुर यांना वरील प्रमाणे सहपत्रांसह योग्य त्या कार्यवाहीस अग्रेषित.

**प्रतिलिपी**:- वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली यांना वरील प्रमाणे सहपत्रांसह योग्य त्या कार्यवाहीस अग्रेषित.

**प्रतिलिपी**:- वनसंरक्षक (प्रादेशिक), धुळे यांना वरील प्रमाणे सहपत्रांसह योग्य त्या कार्यवाहीस अग्रेषित.

**प्रतिलिपी**:- वनसंरक्षक व उपवनसंरक्षक (वन्यजीव) सर्व /विभागीय वन अधिकारी (वन्यजीव) सर्व यांना वरील प्रमाणे सहपत्रांसह योग्य त्या कार्यवाहीस अग्रेषित.

सही/-
सदस्य-सचिव, कार्यकारी समिती तथा
व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ,
नागपूर (करीता)

प्रत — कक्ष-2, योजना, मनिपविमं यांना सहपत्रांसह माहिती व आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी.

PDF Compressor Free Version

# महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या दिनांक 11/12/2020रोजी संपन्न झालेल्या कार्यकारी समितीच्या सभेचा कार्यवृत्तांत

महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या कार्यकारी समितीची 11 वी सभा दिनांक 11डिसेंबर, 2020 रोजी 5.00 वाजता प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर तथा अध्यक्ष, कार्यकारी समिती, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ यांचे अध्यक्षतेखाली "कमांड कंट्रोल रुम"वनभवन,रामगिरी रोड, सिव्हील लाईन्स, नागपूर येथे संपन्न झाली.सभेतउपस्थितकार्यकारी समिती सदस्यत्व उपस्थित अधिकाऱ्यांची यादी सोबत जोडली आहे.**(परिशिष्ट-1)**

व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ तथा सदस्य-सचिव यांनी 11 व्या सभेच्या सुरूवातीस अध्यक्षांचे ,उपस्थित सर्व सदस्यव अधिकाऱ्यांचे स्वागत केले व त्यानंतर अध्यक्षांचे परवानगीने विषयसुचीनुसार सभेच्या कामकाजास सुरुवात केली.श्रीमती श्रीलक्ष्मी, उपमहाप्रबंधक, यांनी विषयवार सादरीकरण केले.

**विषय क्रमांक 1**

**दिनांक 28/02/2020 रोजी कमांड कंट्रोल रुम, वनभवन, सिव्हील लाईन्स, नागपूर येथे झालेल्या कार्यकारी समितीच्या 10 व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणे.**

महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या कार्यकारी समितीची 10 वी बैठकदिनांक 28 फेब्रुवारी 2020 रोजी आयोजीत करण्यात आली होती. सदर सभेचा कार्यवृत्तांत या कार्यालयाचे पत्र क्रमांक व्यसं./मनिपविमं/सभा/ प्र.क्र.10/574/2020-21 दिनांक 04 मार्च, 2020 अन्वये सर्व सन्माननिय सदस्यांना पाठविण्यात आलेला आहे. कार्यवृत्तांतावर कोणत्याही सदस्याकडून कोणत्याही विषयावर आक्षेप किंवा सुधारणाबाबत सुचना प्राप्त झालेल्या नाहीत. तरी सदर कार्यवृत्तांत कायम करण्यात येत आहे.

**विषय क्रमांक 2**

**सन 2019-20 मध्ये प्राप्त अनुदान व वाटप खर्चास मान्यता प्रदान करणे.**

सन 2019-20 मध्ये राज्य निसर्ग पर्यटन विकास योजना (2406-2295) अंतर्गत प्राप्त अनुदान व वाटप खर्चाबाबत परिशिष्ट क्रमांक 2 अन्वये तपशीलवार माहिती सभेत सादर करण्यात आली. त्यास कार्यकारी समितीने नोंद घेतली.

PDF Compressor Free Version

**विषय क्रमांक 3 व 4**

**सन 2020-21 मध्ये प्राप्त अनुदान व वाटप खर्चाची सद्यस्थिती.**

**सन 2020-21 निसर्ग पर्यटन विकासाकरीता वार्षीक आराखडा.**

सन 2020-21 मध्ये राज्य निसर्ग पर्यटन योजना (2406-2295) अंतर्गतरुपये 5000.00 लक्षचे अंदाजपत्रक शासनास सादर करण्यात आले आहे व त्यापैकी रुपये 100.00 लक्षचा नियतव्यय मंजुर आहे. तसेच आदिवासी क्षेत्रात वनपर्यटनास चालना राज्यउपयोजना (2406-8651) अंतर्गत रुपये 400.00 लक्ष नियतव्यय मंजुर आहे. याबाबतचा तपशिलवार अहवाल परिशिष्ट क्रमांक 3 व 4 अन्वये सभेत सादर करण्यात आला. सदर अहवालास कार्यकारी समितीने नोंद घेतली.

**विषय क्रमांक 5**

**Vision Document for the Development of Eco-tourism in Maharashtra या अहवालास मान्यता देणे.**

मंडळाचे कार्यकारी समितीद्वारे Proparation of Vision Document for the Development of Eco-tourism in Maharashtra करीता दिलेल्या मान्यतेनुसार तज्ञ सल्लागांरानी तयार केलेल्या अहवालास कार्यकारी समितीद्वारे मान्यता देण्यात आली.

**विषय क्रमांक 6**

**मंडळाचे नवीन मानचिन्हाला (Logo) मान्यता देणे.**

मंडळाद्वारे तयार करुन घेण्यात आलेल्या मंडळाचे नविन मानचिन्हाला कार्यकारी समितीद्वारा मान्यता देण्यात आली.

**विषय क्रमांक 8**

**मंडळाचे स्टेट बँक ऑफ इंडिया, खात्यात जमा रकमेबाबत तपशील तसेच मंडळाच्या सन 2018-19 करीताच्या लेखा परिक्षण अहवालास मान्यता देणेबाबत.**

PDF Compressor Free Version

मंडळाद्वारे सन 2018-19 मध्ये जमा खर्चाचे मंडळातर्फे नियुक्त C.A. M/s. JNSB & Co., Nagpur यांचेकडुन लेखा परिक्षण करुन घेण्यात आले. त्यांनी दिलेल्या अहवालास कार्यकारी समितीने मान्यता दिली. **तसेच सन 2019-20 चे लेखा परिक्षण तात्काळ करुन घेण्याबाबत सुचना दिल्या.**

मंडळाने दिनांक 4 मे, 2020 चे शासन निर्णयानुसार मंडळाचे खात्यात जमा रक्कम मंडळाचे विविध उपक्रम व आस्थापनावरील खर्चाकरीता आवश्यक असल्याने शासन खात्यात जमा करण्याचे निर्बंधातून सुट मिळण्याबाबत प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजनव विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना दिनांक 27/05/2020 चे पत्रान्वये विनंती करण्यात आली होती. त्यानुसारप्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजनव विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना दिनांक 28/05/2020 चे पत्रान्वये शासनाला शिफारस केलेली आहे. यावर शासनाकडून अद्यापपावेतो कोणतेही निर्देश प्राप्त झालेले नसल्याने मंडळाचा खर्च याच रक्कमेतुन सुरु असल्याची माहिती सभेत देण्यात आली.

**विषय क्रमांक 9**

**मंडळाची स्वतंत्र Website विकसील करणे व प्रचार प्रसिध्दी करीता Facebook व Youtubeसारख्या समाजमाध्यमांच्या वापराबाबत.**

मंडळाचे कार्यकारी समितीने दिलेल्या मान्यतेनुसार मंडळाने NIC च्या माध्यमातूनमंडळाची स्वतंत्र Website विकसीत करण्यात येत असल्याचे व याकरीता रु. 14,55,286/- खर्च करण्यात आल्याची माहिती सभेत देण्यात आली. त्याच प्रमाणे निसर्ग पर्यटन स्थळाच्या प्रचार प्रसिध्दी व निसर्ग शिक्षणाच्या दृष्टीने Facebook, Youtubeई. समाज माध्यमांचा वापर करण्याकरीता Nature Collectiveचे श्री. शार्दुल बाजीकर यांचेशी मंडळाने समझौता करार केला असून याकरीता एकुण रु. 4,55,800/- इतका खर्च करण्यात येणार असल्याची माहिती सभेत देण्यात आली.

**विषय क्रमांक 10**

**महाराष्ट्र निसर्ग पर्यटन धोरण-2020 (प्रारुप)**

राज्य निसर्ग पर्यटन धोरण-2020 चे प्रारुप तयार करण्यात आले असून शासन मान्यतेस्तव सादर करण्यात आले असल्याची माहिती सभेत सादर करण्यात आली. तसेच नविन पर्यटन धोरणामधील वैशिष्टपुर्ण बाबी सभेत विषद करण्यात आल्या.

PDF Compressor Free Version

**विषय क्रमांक 7 व 11**

- **तानसा, नांदुर मध्यमेश्वर व टिपेश्वर अभयारण्य क्षेत्रामध्ये निसर्ग पर्यटन विकासाकरीता मंडळाद्वारे नियुक्त तज्ञांद्वारे तयार करण्यात आलेल्या बृहत आराखडयास (Master Plan) मान्यता देणे.**
- **मंडळाकडे प्राप्त निसर्ग पर्यटन स्थळांचे आराखडयास मान्यता प्रदान करणे.**

मंडळाद्वारे पॅनलवरील तज्ञ सल्लागारांकडून तानसा, नांदुरमध्यमेश्वर व टिपेश्वर अभयारण्याचे बृहत आराखडे तयार करण्यात आले असुन त्यामधील तपशिल व अंदाजीत खर्च याबाबत परिशिष्ट क्रमांक 7 अन्वये माहिती देण्यात आली आहे. तसेच 1) कन्हेरी वनउद्यान(बारामतीवनपरिक्षेत्र)व 2) कडबनवाडी उद्यान (इंदापुर वनपरिक्षेत्र)या पर्यटन स्थळाचे सादरीकरण मुख्य वनसंरक्षक (प्रादेशीक) पुणे, उपवनसंरक्षक (प्रा.) पुणे, व 3) श्री. संत सेवालाल महाराज सेवा समाधि स्थळ (पोहरादेवी) या पर्यटन स्थळाचे सादरीकरण मुख्य वनसंरक्षक (प्रादेशीक) यवतमाळ, व उपवनसंरक्षक, वाशीम यांनी केले. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशीक) पुणे, उपवनसंरक्षक (प्रा.) पुणे, यांनी आराखडयाचे सादरीकरण अत्यंत सुमार दर्जाचे व PPT तयार करुन सादरीकरण न केल्याबद्दल समितीने नाराजी व्यक्त केली व यापुढे आवश्यक दक्षता घेण्याचे सुचीत केले. वरील सर्व सादरीकरण केलेल्या आराखडयाबाबत तसेच तज्ञांकडून प्राप्त 3 बृहत आराखडयाबाबत सभेत चर्चाकरुन खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.

| अ.क्र. | विषय | समितीचा निर्णय |
|---|---|---|
| विषय क्रमांक 7 | | |
| 1. | अ) **तानसा अभयारण्य** निसर्ग पर्यटन विकासा करीता बृहत आराखडा.<br>आराखडा कालावधी :- 3 वर्षे<br>अंदाजीत रक्कम :- रु.1762.00 लक्ष<br><br>ब) **नांदुर मध्यमेश्वरअभयारण्य** निसर्ग पर्यटन विकासा करीता बृहत आराखडा.<br>आराखडा कालावधी :- 3 वर्षे<br>अंदाजीत रक्कम :- रु.1500.00 लक्ष<br>क) **टिपेश्वर अभयारण्य** निसर्ग पर्यटन विकासा करीता बृहत आराखडा.<br>आराखडा कालावधी :- 3 वर्षे | बृहत आराखडयात संकल्पीत कार्यबाबींचे अमलबजावणी करीता सर्वकष आराखडा (DPR) तयार करुन त्याप्रमाणे संबंधीत यंत्रणेनी अनुदान उपलब्धते करीता मंडळाकडे प्रस्ताव सादर करावे. वरील अटिंच्या अधिन आराखडयास मान्यता देण्यात येत आहे. याकरीता सर्वप्रथम DPR तयार करण्याकरीता अनुदान मागणी प्रस्ताव सादर करावा. |

PDF Compressor Free Version

| | | |
|---|---|---|
| | अंदाजीत रक्कम :- रु.13.29 लक्ष | |
| **विषय क्रमांक 11** | | |
| 1. | **कन्हेरी वनउद्यान** (बारामती वनपरिक्षेत्र) निसर्ग पर्यटन विकासा करीता आराखडा.<br>आराखडा कालावधी :- 1वर्षे<br>अंदाजीत रक्कम :- रु.1103.83 लक्ष<br>क्षेत्र :- वनक्षेत्र 43 हेक्टर | • आराखडयामध्ये कोणत्याही कार्यबाबी वनसंवर्धन कायदा-1980 मधील तरतुदीचा भंग करण्याऱ्यानसाव्यात व तसे मुख्य वनसंरक्षक (प्रा.) पुणे यांनी प्रमाणपत्र द्यावे.<br>• विविध वनांकरीता लावण्यात येणाऱ्या प्रजाती शक्यतोवर स्थानिक असाव्यात व या क्षेत्रातील वातावरणाचा विचार करुन या क्षेत्राकरीता सुयोग्य प्रजातींचीच लागवडीकरीता निवड करावी<br>• निसर्ग पर्यटन स्थळाचे व्यवस्थापन स्थानिक संयुक्त वनव्यावस्थापन समितीच्यासहभागाने करण्यात येणार असल्याने त्यांची क्षमता बांधणी प्रशिक्षण ईत्यादी बाबींचा समावेश करावा. तसेच पर्यटन स्थळाची प्रचार प्रसिध्दी व DPR तयार करणे ईत्यादीचा ही प्रस्तावात समावेश करण्यात यावा.<br>• वरील आराखडयामध्ये आवश्यक सुधारणा करुन वनसंवर्धन कायदा-1980 मधील तरतुदिंचे पालन करणे या अटिंवर आराखडा अंदाजीत रक्कम रुपये 1103.83 लक्ष ला 2020-21 या कालावधीकरीता वरील अटिंच्या अधिन आराखडयासमान्यता प्रदान करण्यात येत आहे.आराखडयात संकल्पीत कार्यबाबींचे अमलबजावणी करीता सर्वंकष आराखडा (DPR) तयार करुन त्याप्रमाणे संबंधीत यंत्रणेनी अनुदान उपलब्धते करीता मंडळाकडे प्रस्ताव सादर करावे.याकरीता सर्वप्रथम DPR तयार करण्याकरीता अनुदान मागणी प्रस्ताव सादर करावा. |
| 2. | **कडबनवाडी उद्यान** (इंदापुर वनपरिक्षेत्र) निसर्ग पर्यटन विकासा करीता आराखडा.<br>आराखडा कालावधी :- 1वर्षे<br>आराखडा किंमत :- रु.498.58 लक्ष<br>क्षेत्र :- वनक्षेत्र 28 हेक्टर | सदर क्षेत्रातील महत्वपुर्ण वन्यप्राणी प्रजाती चिंकारा असल्याने या प्रजातीचे व ईतर वन्यजीवांचे व त्यांच्या अधिवासांचे संरक्षण/ संवर्धन करणे हा मुख्य उद्देश असावा. पर्यटनाकरीता वरील उद्देश्य केंद्र स्थानी ठेवुनच व किमान हस्तक्षेप होईल अश्या रितीने नियोजन करावे 28 हेक्टर क्षेत्रापैकी 1 ते 1.5 हेक्टर क्षेत्र "मनोरंजन प्रक्षेत्र"म्हणून वनसंवर्धन कायदा-1980 अंतर्गत आवश्यक अनुमती घेऊन विकसीत |

PDF Compressor Free Version

| | | |
|---|---|---|
| | | करण्याचे सुचीत करण्यात आले.याबाबतचा अहवाल पुणे वृत्ताचे पालक अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक यांचे शिफारसीसह सादर करावा. निसर्ग पर्यटन स्थळाचे व्यवस्थापन स्थानिक संयुक्त वनव्यावस्थापन समितीच्यासहभागाने करण्यात येणार असल्याने त्यांची क्षमता बांधणी प्रशिक्षण ईत्यादी बाबींचा समावेश करावा. तसेच पर्यटन स्थळाची प्रचार प्रसिध्दी व DPR तयार करणे ईत्यादीचा ही प्रस्तावात समावेश करण्यात यावा.<br>वरील अटिंच्या अधिन आराखडयास मान्यता देण्यात येत आहे.आराखडयात संकल्पीत कार्यबाबींचे अमलबजावणी करीता सर्वंकष आराखडा (DPR) तयार करुन त्याप्रमाणे संबंधीत यंत्रणेनी अनुदान उपलब्धते करीता मंडळाकडे प्रस्ताव सादर करावे. याकरीता सर्वप्रथम DPR तयार करण्याकरीता अनुदान मागणी प्रस्ताव सादर करावा. |
| 3. | श्री. संत सेवालाल महाराज सेवा समाधि स्थळ **(पोहरादेवी)** निसर्ग पर्यटन विकासा करीता आराखडा.<br>आराखडा कालावधी :- 2020-2023<br>आराखडा किंमत :- रु.19908.11 लक्ष<br>क्षेत्र :- 100 हेक्टर<br>मनोरंजन प्रक्षेत्र :- 12 हेक्टर<br>समवड क्षेत्र :- 88 हेक्टर | 12 हेक्टर क्षेत्रावर प्रस्तावीत मनोरंजन प्रक्षेत्राकरीता वनसंवर्धन कायदा-1980 अंतर्गत तरतुदीनुसार आवश्यक मंजुरी घ्यावी. निसर्ग पर्यटन स्थळाची देखभाल दुरुस्तीकरीता आवश्यक रक्कम कश्याप्रकारे प्राप्त होणार आहे? पर्यटकांची अनुमानीत संख्या, प्रवेश शुल्क, ईतर स्त्रोत विचारात घेऊन वआर्थिक बाबी नमुद करुन हा प्रकल्प कश्याप्रकारे स्वयंचलीत राहील याबाबतचा अहवाल यवतमाळ वृत्ताचे पालक अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक यांचे शिफारसीसह सादर करावा.निसर्ग पर्यटन स्थळाचे व्यवस्थापन स्थानिक संयुक्त वनव्यावस्थापन समितीच्यासहभागाने करण्यात येणार असल्याने त्यांची क्षमता बांधणी प्रशिक्षण ईत्यादी बाबींचा समावेश करावा. तसेच पर्यटन स्थळाची प्रचार प्रसिध्दी व DPR तयार करणे ईत्यादीचा ही प्रस्तावात समावेश करण्यात यावा.वरील अटिंच्या अधिन आराखडयास मान्यता देण्यात येत आहे.आराखडयात संकल्पीत कार्यबाबींचे अमलबजावणी करीता सर्वंकष आराखडा (DPR) तयार करुन त्याप्रमाणे संबंधीत यंत्रणेनी अनुदान उपलब्धते करीता मंडळाकडे प्रस्ताव सादर करावे. याकरीता सर्वप्रथम DPR तयार करण्याकरीता अनुदान मागणी प्रस्ताव सादर करावा. |

PDF Compressor Free Version

शासनाद्वारे निसर्ग पर्यटन विकासाकरीता देण्यात येत असलेला निधीचा आर्थिक वर्षात व मंजुर कार्यबार्वीकरीता होत असल्याबाबत तसेच त्यांचेकडे कोणत्याही प्रकारे निधी शिल्लक नसल्याचे प्रमाणपत्र घेऊनच पुढील निधी वाटप करण्यात यावा, अशा सुचना कार्यकारी समितीने दिल्या.

त्याच प्रमाणे ज्या वनवृत्तात निसर्ग पर्यटन योजने अंतर्गत प्राप्त निधी शिल्लक असेल व JFM किंवा ईतरत्रजमा करुन ठेवला असेल त्याबाबत सर्व नियंत्रक अधिकाऱ्यांकडून पुढिल अनुदान वाटपापुर्वी अहवाल प्राप्त करुन घेण्याच्या समितीने सुचना दिल्या.

निसर्ग पर्यटनाशी संबंधीत स्थनिकांचे क्षमता बांधणी प्रशिक्षण तसेच विद्यार्थांमध्ये निसर्गाबद्दल आपुलकी व जागरुकता निर्माण होण्याच्या दृष्टीने निसर्गानुभव सारखे कार्यक्रम राबवीण्याकरीता आवश्यक निधीकरीता प्रस्ताव सादर करणे बाबत समिती सदस्य तथा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कॅम्पा) यांनी सुचित केले.

कोणताही निसर्ग पर्यटन विकास प्रकल्प तयार करतेवेळी त्या स्थळांवर नेमके काय करावयाचे आहे त्याचा नेमका उदेश्य असावा. त्या स्थळावर अनुमानीत पर्यटक संख्या व सदरचा प्रकल्प कशाप्रकारे स्वयंचलीत राहील याबाबतचा सविस्तर तपशील प्रत्येक आराखडयाचे सादरीकरणामध्ये समावीष्ट असावा, असे समिती सदस्य श्री. टेंभुर्णीकर, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक(महाकॅम्पा), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी सुचीत केले.

सभेच्या शेवटी व्यवस्थापकीय संचालक, निसर्ग पर्यटन विकास मंडळा, नागपूर यांनी उपस्थितांचे आभार मानून अध्यक्षांचे परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

Sd/-

**सदस्य सचिव, कार्यकारी समिती व**
**व्यवस्थापकीय संचालक,**
**महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळा,**
for **नागपूर**

PDF Compressor Free Version

परिशिष्ट-1

## दिनांक 11/12/2020 रोजीआयोजीतमहाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर कार्यकारी समितीची सभा उपस्थित पदाधीकारी.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नांव | समितीमधील पद | पदनाम |
|---|---|---|---|
| 1. | डॉ. एन. रामबाबु | अध्यक्ष | प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबलप्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर |
| 2. | श्री.जी. साईप्रकाश | सदस्य | प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर |
| 3. | श्री नितीन काकोडकर | सदस्य | प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर |
| 4. | श्री. एस.जी. टेंभुर्णीकर | सदस्य | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक(महाकॅम्पा), महाराष्ट्र राज्य, नागपूर |
| 5. | श्री. सुनिल लिमये | सदस्य | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पश्चिम मुंबई |
| 6. | श्री. विकास गुप्ता | सदस्य सचिव | व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर |
| 7. | श्री. संजीव गौड | विशेष आमंत्रीत | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केन्द्रस्थ अधिकारी, नागपूर |
| 8. | श्रीमती मीरा अय्यर | सदस्य | मुख्य महाव्यवस्थापक, एफ.डी.सी.एम., नागपूर |
| 9. | श्री. एस.आर. डोइल | | मुख्य वनसंरक्षक (प्रा.) पुणे |
| 10. | श्रीमती ए. श्रीलक्ष्मी | | उप महाप्रबंधक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर |
| 11. | श्री. राहुल पाटिल | | उप वनसंरक्षक (प्रा.) पुणे |
| 12. | श्री. सुनिल आर. पाटील | | D.M., PIU, FDCM Ltd., Nagpur |
| 13. | श्री. किशोर मिश्रीकोटकर | | उपमहाप्रबंधक (क) महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर |
| 14. | श्री. एम.जी. ठेंगडी | | विभागीय वन अधिकारी, कॅम्पा (अति. कार्यभार), नागपूर |

**कार्यवृत्तांत प्र.मु.व.सं.(वबप्र) तथा**
**अध्यक्ष, का.स. मनिपविमं यांचेद्वारा मंजुर**